# नागरिकांना चालण्यासाठी दिवा शहरातील फुटपाथ मोकळे करा


दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

facebook page /Diwanews


■ **दिवा न्यूज विशेष**

दिवा शहर हे दाटीवाटीने वसले असल्याने शहर वसताना या ठिकाणी नियोजनाचा अभाव होता. याचा फटका येथील रस्त्यांच्या नियोजनाला बसला. निमुळते रस्ते असल्याने वाहतूक कोंडी हे भविष्यातील मोठे संकट दिव्यात असणार आहे. (पान ३ वर)


वर्ष-२ ■ अंक-२ ■ सोमवार, १५ ऑगस्ट २०२२ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669





दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, १५ ऑगस्ट २०२२


# ठाण्यात इमारतीवरील लोखंडी शेड उडाली

**ठाणे:** घोडबंदर रोड,कासारवडवली गाव येथील भोईर सदन या इमारतीवरील छताची लोखंडी शेड शेजारी असलेल्या तळ अधिक एक मजली साजिदा मंजिल या घरावरती पडल्याची घटना बुधवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास घडली. तर, लोखंडी शेड पडल्यामुळे घराचे सिमेंट पत्रे फुटून नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

भोईर सदन ही इमारत तळ अधिक चार मजली असून त्याचे मालक महादू भोईर आहे. भोईर सदन या इमारतीवरील (२० ÷ ३०) छताची लोखंडी शेड शेजारी असलेल्या साजिदा मंजिल तळ अधिक १ मजली या घरावरती पडली अशी माहिती मिळताच घटनास्थळी कासारवडवली पोलीस कर्मचारी, महावितरण विद्युत विभागाचे कर्मचारी, माजिवडा - प्रभाग समिती बांधकाम विभागाचे उप अभियंता, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. घरावरती पडलेली लोखंडी पत्र्याची शेड आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन केंद्राच्या जवानांकडून बाजूला केली अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

## शेड पडलेल्या घराचे पत्रे फुटले





**गुजराती विकास मंडळ (दिवा) च्या वतीने देवी दशामाच्या जागरण व विसर्जन सोहळा पार पडला.यावेळी गुजराती विकास मंडळ च्या वतीने दातीवली तलाव येथे विसर्जन व्यवस्था करण्यात आली होती, ठाणे महानगर पालिका आणि पोलिस प्रशासनने देखील भाविकांना सहकार्य केले. व्यवस्थापक अशोक सोलंकी, मिनू गोहिल, शैलेश राठोड, किशन वालेरा, विनुबेन पडाया, मिनाबेन पटेल, कांताबेन वालेरा, विरुबेन सोसा, महेश जागरिया, किशोर दांताणी, जयेश सोलंकी, प्रग्नेश शाह आदी यावेळी उपस्थित होते.**

## माजी आमदारांच्या बंगल्यात पडले झाड

**ठाणे:** शीळ नाका येथील माजी आमदार सुभाष भोईर यांच्या बंगल्याच्या आवारातील झाड पडल्याची घटना बुधवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसून पडलेले झाड अग्निशमन दलाच्या जवानांनी कापून बाजूला केले, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१

**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने

**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## खाडीत उडी मारणारा बचावला
### दक्ष स्थानिकांमुळे तरुणाचा वाचला जीव

**ठाणे:** कौटुंबिक भांडण झाल्यामुळे कळवा खाडीमध्ये उडी मारणाऱ्या गंगाधर जाधव (३५) या वर्षीय तरुणाला स्थानिक दक्ष नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दल हे विभाग घटनास्थळी दाखल होण्यापूर्वीच सुखरूप खाडीतून बाहेर काढले. ही घटना शुक्रवारी दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास घडली.

कळवा,भीम नगर येथे राहणारा गंगाधर याने कौटुंबिक भांडण झाल्यानंतर खाडी उडी मारली, अशी माहिती राठोड नामक व्यक्तीने आपत्ती व्यवस्थापन कक्षेला दिली. माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दल या विभागांनी घटनास्थळी धाव घेतली होती. पण, त्याला स्थानिकांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

## सिग्नल शाळेच्या रोबेटिक लॅबमध्ये बनली एलएडी राखी

**ठाणे:** अभिनव व प्रयोगशिल शिक्षणाच्या माध्यमातुन रस्त्यावरील मुलांना दर्जात्मक शिक्षण देत असलेल्या सिग्नल शाळेतील रोबेटिक लॅबमध्ये रक्षाबंधनाच्या निमित्ताने मुलांनी खास एलएडी राख्या बनवलया. शाळेतील आपल्या सहअध्यायी भावा बहिणींनी बनवलेल्या या राख्या बांधुन आज तंत्रज्ञानाने परिपुर्ण असा रक्षाबंधन सण सिग्नल शाळेत साजरा करण्यात आला.

साध्या सुती दो-यापासुन तर कार्टुन व विविध तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या राख्या बाजारपेठेत एकीकडे उपलब्ध असतांना सिग्नल शाळेच्या मुलांनी आपल्या रोबेटिक लॅबच्या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून आपल्या सहअध्यायी भावा बहिणींसाठी खास एलएडी राखी बनवत प्रतिकुलतेच्या लढाईत एकमेकांना संरक्षणाची हमी दिली.

विविध सिग्नलवर निर्वासित मुलांसाठी आठ वर्षांपुर्वी समर्थ भारत व्यासपीठ व ठाणे महागरपालिका शिक्षण विभाग यांनी ठाण्याच्या तीन हात नाका येथे सिग्नल शाळा सुरू केली. मुख्य धारेच्या शिक्षणासोबत कला,क्रीडा, संगणक , विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे आधुनिक व प्रयोगशिल शिक्षण मिळावे म्हणून शाळेत संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा व रोबेटिक लॅब सुरू केली. नुकत्याच पुणे येथे राष्ट्रीय स्तरावरील रोबेटिक स्पर्धे ला देखील सिग्नल शाळेच्या मुलांनी आपला रोबो स्पर्धेत उतरवला होता.

सीडबी बँकेच्या सहकार्याने आत्ताच रोबेटिक लॅब अध्ययावत करण्यात आली असुन तेथे चिल्ड्रन टेक सेंटरच्या माध्यमातुन निष्णात प्रशिक्षक देखील नियुक्त करण्यात आहेत. या शिक्षकांच्या मदतीने मुले रोबेटिकचे शिक्षण घेत आहेत. रक्षाबंधनच्या निमित्ताने दीड व्हॉल्टचा बटन सेल व एलइडी बल्बचा वापर करत मुलांनी सुंदर राख्या साकारल्या व याच राख्या एकमेकांना बांधुन सिग्नल शाळेतील रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला.

सण उत्सवांतील पवित्रपणा जपत त्यातुन जिज्ञासा वाढीस लागावी यासाठी सिग्नल शाळा नेहमीच प्रयत्नशिल असते असे यावेळी समर्थ भारत व्यासपीठाचे संचालक उल्हास कार्ले यांनी सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृष्ण बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज



# कल्याण शीळफाटा-रांजनोली सहापदरी मार्ग उन्नत करा

## वाहतूक नियोजन आणि कोंडी टाळण्यासाठी

### खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांची मागणी

***ठाणे:** वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणाऱ्या कल्याण शीळफाटा ते रांजनोली या सहापदरी मार्गाच्या उभारणीचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. या मार्गात विविध ठिकाणी वर्दळीचे चौक आहेत. या चौकाचौकांत संभाव्य कोंडी टाळण्यासाठी हा मार्ग उन्नत स्वरूपात बांधावा, अशी मागणी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला लेखी निवेदन करत त्यांनी ही मागणी केली आहे.*



कल्याण लोकसभा मतदारसंघात वाहतूक व्यवस्थापन आणि कोंडीमुक्त प्रवास करण्यासाठी गेल्या काही वर्षांमध्ये खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने विविध प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. त्यातील बहुतांश प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. येत्या काळात हे प्रकल्प पूर्ण झाल्यास कल्याण शीळ रस्त्यावरील वाहनचालक थेट आग्रा महामार्गावर विना अडथळा प्रवास करू शकणार आहे. कल्याण शीळ महामार्ग आणि मुंबई आग्रा महामार्गांना जोडण्यासाठी शीळफाटा ते रांजनोली हा सहा पदरी महत्वाकांक्षी रस्ता प्रकल्प प्रस्तावीत असून त्याचे कामदेखील युद्ध पातळीवर सुरू आहे. या मार्गाच्या उभारणीमुळे या भागातील वाहतूक गतीमान होण्यास मदत होणार आहे. या कल्याण शीळफाटा ते भिवंडी रांजनोली नाक्यापर्यंतच्या भागात विविध कोंडीची ठिकाणे आहेत. यात मानपाडा जंक्शन, सूचक नाका, शिवाजी चौक, कोनगाव चौक अशा महत्वाच्या जंक्शनवर आणि सर्वच चौकांमध्ये येत्या काळात वाहनांची संख्या वाढणार आहे. लोकसंख्येची वाढ पाहता त्यादृष्टीने विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे या पूर्ण मार्गावर अशा ठिकाणी कोंडी टाळून प्रवास करण्यासाठी हा मार्ग पूर्णपणे उन्नत स्वरूपाचा उभारावा, अशी मागणी खासदार डॉ. शिंदे यांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला लेखी निवेदन करत त्यांनी ही मागणी केली आहे. उन्नत मार्ग उभारल्यानंतर हा मार्ग कोंडी विरहीत होईल. तसेच हा प्रवास विनाअडथळा आणि गतीमान होईल. अंबरनाथ, बदलापूर या शहरांकडून येणारे मार्गही याला जोडता येईल. तसेच कल्याणचा रिंगरोड मार्गही पुढे याला जोडता येईल, असे डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले आहे. त्यामुळे नागपुरच्या धर्तीवर या उन्नत मार्गाच्या उभारणीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्याच्या तांत्रिक उपकरणांसाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यासाठी संबंधितांना तातडीने योग्य त्या सूचना देण्याचीही मागणी डॉ. शिंदे यांनी केली आहे.

# नागरिकांना चालण्यासाठी दिवा शहरातील फुटपाथ मोकळे करा

***(पान १ वरून)***

*वाढती लोकसंख्या आणि वाढती वाहन संख्या लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने दिवा शहरातील रस्त्यांच्या कडेने असणारे फुटपाथ हे मोकळे करायला हवेत. या फुटपाथवर बसणारे फेरीवाले यांचे योग्य नियोजन करून त्यांच्यासाठी अन्यत्र जागा उपलब्ध करून द्यायला हवी. फुटपाथ मोकळे झाल्यास रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत घेऊन चालावे लागत असल्याच्या घटना कमी होतील.अनेक वेळा यातून नागरिकांचे रस्त्यातून चालताना अपघात देखील झाले आहेत. दिवा शहरांमध्ये फेरीवाला धोरण राबवून अंतर्गत रस्त्यांना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित केल्यास, मुख्य रस्त्यांवरील फुटपाथची जागा मोकळी होईल. नागरिकांना चालण्यास फुटपाथ उपलब्ध झाल्यास रस्ते हे वाहनांसाठी उपलब्ध राहतील. आजच्या घडीला दिवा शहरातील मुख्य रस्त्यांवरून नागरिकांना जीव मुठीत घेऊन चालावे लागते. दिवा स्टेशन पासून आगासन रोड, मुंब्रा देवी कॉलनी रस्ता, साबे गाव रस्ता या सर्व प्रमुख रस्त्यांवर फुटपाथ हे फेरीवाल्यानी अडवल्याने वाहतूक कोंडी निर्माण होतेच, शिवाय नागरिकांचा जीव ही धोक्यात येतो. दिवा शहरात असणाऱ्या अंतर्गत गल्ल्या आणि छोटे रस्ते यांना फेरीवाला क्षेत्र घोषित करून त्या ठिकाणी फेरीवाल्यांसाठी जागा उपलब्ध करून दिल्यास किंवा अन्यत्र फेरीवाला मार्केट उभारल्यास मुख्य रस्त्यांवरील गर्दी कमी होईल. याचा फायदा शहरातील नागरिकांना होईल. पालिकेने याबाबत गांभीर्याने विचार करायला हवा, अशी येथील असंख्य नागरिकांची भावना आहे मागणी आहे.दिवा प्रभाग समितीने अधिकारी याकडे गांभीर्याने लक्ष देतील का हा प्रश्न आहे.*

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव निमित्ताने प्रभाग क्रमांक ११ मध्ये तिरंगा रॅली

**ठाणे:**–माजी नगरसेवक कृष्णा पाटील यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक ११ मध्ये स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी प्रभागातील तरुण, तरुणी,महिला व नागरिक मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले. गोकुळ नगर,माजीवडा नाका,कोलबाड, खोपट, नितीन कंपनी, उथळसर,वृंदावन,श्रीरंग सोसायटी,ऋतू पार्क याभागात ही रॅली काढण्यात आली.



# लोकमान्यनगरमधील स्व.रामचंद्र ठाकुर जलतरण तलाव महिन्याभरात खुला करा

## अन्यथा आंदोलनाचा आमदार सरनाईकांचा इशारा



**ठाणे :** लोकमान्यनगर येथील स्व. रामचंद्र ठाकुर जलतरण तलावाची गुरुवारी आमदार प्रताप सरनाईक यांनी महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांसह पाहणी केली. त्यावेळी पालिकेच्या बांधकाम खात्यातील काही अधिकारी व ठेकेदारांच्या चुकीमुळे जलतरण तलावाचा फिल्ट्रेशन प्लांट व क्लोरीन प्लांट चुकीच्या ठिकाणी व चुकीच्या पध्दतीने बसविण्यात आल्याचे निर्दशनास आले. त्यामुळे दररोज स्विमिंग पुल चालू होण्यासाठी फिल्ट्रेशन प्लांट चालू केल्यानंतर पाणी स्वच्छ करण्याकरिता त्या ठिकाणी असलेली विद्युत मोटर सातत्याने जळत असल्याने स्विमिंग पुल चालू करणे शक्य नाही. ही बाब वेळीच दुरुस्त करून महिन्याभरात हा स्विमिंग पूल सुरू करावा, अन्यथा ११ सप्टेंबरला आंदोलन करण्यात येईल असा इशारा ही त्यांनी दिला आहे.

कोरोनाच्या संकटकाळात पालिकेच्या बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे बंद असलेल्या स्विमिंग पुलाबाहेरील लाद्या व स्विमिंग पुलमधील टाईल्स पाहणी दरम्यान तुटलेल्या आढळल्या. तसेच स्विमिंग पुल शेजारील स्पोर्टस् कॉम्प्लेक्स मधील पीओपीचे छप्पर पुर्णपणे तुटलेले असून व्यायामशाळेची ही दुर्दशा झालेली ही बाब आमदार प्रताप सरनाईक यांच्या निर्दशनास आल्यानंतर पालिकेचे कार्यकारी अभियंता बर्हिमण व उपअभियंता सरूडकर यांना या संदर्भात विचारणा केली असता त्याचे समर्पक उत्तर देणे त्यांना शक्य झाले नाही. तर क्रिडा खात्याच्या प्रमुख मिनल पालांडे यांना कुठल्याही परिस्थितीमध्ये १० सप्टेंबरपासून हा तरण तलाव नागरिकांसाठी खुला झाला पाहिजे, असे आदेश दिले. तसेच या संदर्भात



पालिकेच्या अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे सर्वसामान्य नागरिकांना नागरी सुविधांपासून वंचित रहावे लागते, त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन आयुक्तांकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी माजी नगरसेवक पूर्वेश सरनाईक, माजी नगरसेविका आशा डोंगरे, विभागप्रमुख रामचंद्र गुरव, उपविभागप्रमुख महेश लोखंडे, भगवान देवकते, रमेश सांडभोर, शाखाप्रमुख सुनिल शिंदे, बाळू जाधव, सामाजिक कार्यकर्ते संदिप डोंगरे, आदी उपस्थित होते.

मोफत ! मोफत !! मोफत !!!
स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवा निमित्त
मोफत मेडिकल चेकअप कॅम्प
सोमवार, १५ ऑगस्ट २०२२, रोजी सकाळी १० ते दु. २.०० वा.

* जनरल फिजिशियन
* स्त्री रोग विशेषज्ञ
* बाल रोग विशेषज्ञ
* वरिष्ठ नागरिकांसाठी विशेष तपासणी
* ब्लड शुगर
* ब्लड ग्रुप
* ब्लड प्रेशर तपासणी
* डोळे तपासणी
* उंची आणि वजन
* हिमोग्लोबीन तपासणी

ई.सी.जी./ चष्मा मोफत

ईतर रक्त तपासणी वर ५०% डिस्काउंट व औषधांवर ३०% सुट

श्री. अशोक सोलंकी
अध्यक्ष

सौ. ज्योती राजकांत पाटील
अध्यक्षा : महिला मोर्चा भा.ज.पा., दिवा शहर मंडळ

कॅम्प चे ठिकाण
आशिर्वाद हॉस्पिटल
मल्टीस्पेशालिटी
9819091314 / 9619291314

ismart Optics

आयोजक : गुजराती विकास मंडळ, दिवा
विशेष सहयोग :
सौ. ज्योती राजकांत पाटील — अध्यक्षा : महिला मोर्चा भाजपा, दिवा शहर मंडळ
डॉ.विद्यासागर दुबे — अध्यक्ष : डॉक्टर आघाडी भाजपा, दिवा शहर मंडळ

व्यवस्थापक :
अशोक सोलंकी 8097686432 | मीना गोहिल 9022058458 | संजय गोहिल 9702782351 | शैलेश राठेड 8828695623 | किशन वालेरा 9892050103 | जयंती ओगानिया 9819754123 | प्रग्नेश शाह 9653436936 | किशोर दंतानी 7045744755 | जयेश सोलंकी 8691848023 | महेश जागरिया 9920725694

# स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा निमित्त भाजप व तन्वी फौंडेशनच्या वतीने ७५ महिलांचा सन्मान सोहळा संपन्न



दिवा:–भारतीय जनता पार्टी दिवा शहर व तन्वी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दिवा येथे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या ७५ महिलांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

बी आर नगर येथील आकांक्षा हॉल मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे आयोजन भाजपच्या वतीने करण्यात आले होते.या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टी ठाणे जिल्हाध्यक्ष आमदार निरंजन डावखरे,महिला नेत्या माधवी नाईक,हर्षाला बुबेरा,मृणाल पेंडसे,भाजप नेते शिवाजी आव्हाड,मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे,अशोक पाटील,विजय भोईर,रोशन भगत,सचिन भोईर,महिला पदाधिकारी आदीसह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दिवा शहरातील सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तव्यदक्ष महिलांचा सन्मान आकांक्षा हॉल येथे पार पडला.





# साखरपा येथे तिल्लोरी कुणबी समाज साखरपा पंचक्रोशी आयोजित विद्यार्थी गुणगौरव व समाजप्रबोधन कार्यक्रम संपन्न




**साखरपा :-** तिल्लोरी कुणबी समाज साखरपा पंचक्रोशीच्या वतीने दरवर्षी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात येतो. कै.नाना शेट्ये सभागृह येथे पार पडलेल्या या सोहळ्यास देवडे,खडी-कोळवण ते चोरवणे या वीस गावातील गुणवंत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुणबी समाजातील सुमारे २०० गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक शिक्षक समुपदेशक मिलिंद कडवईकर सर यांनी दहावी-बारावीनंतर पुढे काय ? या विषयावर मार्गदर्शन केले.करीयर निवडताना घ्यायची काळजी, विविध विद्याशाखांची माहिती, अभ्यासक्रम पूर्व चाचणी परीक्षा, भविष्यातील नोकरीच्या संधी यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी डव्होकेट संदिपजी ढवळ यांनी संविधानाचे महत्व समजावून सांगितले. नवी मुंबईचे उपमहापौरअविनाश लाड म्हणाले की, 'समाजातील विद्यार्थ्यांनी बदलत्या परिस्थितीनुसार नोकरी व व्यवसायाकडे वळावे व त्यासाठी आवश्यक कौशल्य संपादन करावीत.' यावेळी अमोल शेठ लाड, भाऊ कांगणे. शरदचंद्र गीते, विष्णु शेठ रामाणे यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या..या कार्यक्रमाला वंदना जायगडे, दीक्षा मालप, साखरप्याचे सरपंच गोवरे, दाभोळे सरपंच रेवाळे कनकाडीचे सरपंच संतोष गोताड, राजेंद्र धुमक आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल शेठ लाड,रामचंद्र घाणेकर, यशवंत घागरे, शांताराम जाधव, रोहिदास मांडवकर, गंगाराम शेलार, रमेश ढवळ, बापू ढवळ ,सुनील शिवगण, प्रमोद जायगडे, रवींद्र जयगडे ,महेश कांबळे सिताराम करंबेळे, संदीप जोयशी, राजेंद्र जोयशी ,संजय बाईंग ,शरद गार्डी ,किरण गार्डी ,तुकाराम मांडवकर यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामचंद्र घाणेकर सर व आभार बापू ढवळ तर सूत्रसंचालन यशवंत घागरे यांनी केले.

# मुसळधार पावसात एकता तिरंगा रॅलीला भरघोस प्रतिसाद



**रत्नागिरी:-** स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव अंतर्गत घरोघरी तिरंगा मोहिमेला शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील १०० फूटी स्तंभावरील ध्वजारोहणाने सुरुवात झाली. मुसळधार पाऊसधारांमध्ये भिजत हजारो रत्नागिरीकरांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली व राष्ट्रभक्तीची ओळख करुन दिली.

शनिवारी सकाळी ९ वा. जिल्हाधिकारी डॉ. बी.एन.पाटील यांच्या हस्ते हे ध्वजारोहण झाले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इन्दूराणी जाखड, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. मोहितकुमार गर्ग आदिं प्रमुख उपस्थिती होती. तसेच अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुशांत खांडेकर, प्रांताधिकारी रत्नागिरी विकास सुर्यवंशी, रत्नागिरी तहसिलदार शशिकांत जाधव आदिंची उपस्थिती होती.

यावेळी विविध शाळांचे व महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. तसेच पोलीस दलाने राष्ट्रध्वजास मानवंदना दिली व पोलीस बॅन्ड पथकाने राष्ट्रगीत सादर केले. भर पावसात चिंब भिजत महाविद्यालयीन युवतींनी जयगान यावेळी सादर केले. क्रिडाधिकारी कार्यालयातील स्पर्धेच्या विजेत्यांना यावेळी पुरस्कार देण्यात आले. यावेळी दुचाकी, चारचाकी व रिक्षा यांची एकता तिरंगा रॅली निघाली याला जिल्हाधिकारी डॉ.बी.एन.पाटील यांनी हिरवा झेंडा दाखविला व ते स्वत: या रॅलीत सामिल झाले. त्यांचे दुचाकीवरील सारथ्य पोलीस अधिक्षक डॉ. मोहितकुमार गर्ग यांनी केले. या रॅलीचे आयोजन जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस दर, हेल्पिंग हॅन्डस, रत्नागिरी पत्रकार परिषद, व्यापारी संघटना, श्री रत्नागिरीचा राजा मित्रमंडळ यांनी संयुक्तपणे केले.

# विद्यार्थी झाले कर्मचारी! कमवा आणि शिका योजनेतून जिल्हापरिषदेत करताहेत काम



**रत्नागिरी:-**कमवा आणि शिका मोहिमेतर्गत रत्नागिरी जिल्हापरिषदेत दहा विद्यार्थ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.हे दहा विद्यार्थी सध्या जिल्हापरिषद समाजकल्याण विभागात कर्मचारी म्हणून काम करत आहेत.राज्यात पुण्यानंतर कमवा आणि शिक्षा हि मोहिम राबविणारा रत्नागिरी हा दुसरा जिल्हा ठरला आहे.

जिल्हापरिषद समाजकल्याण विभागाच्या वतीने जिल्हापरिषेद सेस निधीतून कमवा आणि शिका हि योजना राबवली जात आहे.इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठात बीबीए पदवी साठी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हापरिषदेत कर्मचारी म्हणून काम करण्याची संधी देण्यात आली आहे.दहा विद्यार्थ्यांची तीन वर्षांसाठी निवड झाली असून त्यांना विद्यावेतन देण्यात येणार आहे.पहिल्या वर्षासाठी दर महिना आठ हजार रूपये विद्यावेतन,दुसऱ्या वर्षासाठी नऊ हजार रूपये आणि तिसऱ्या वर्षासाठी दहा हजार रूपये विद्यावेतन देण्यात येणार आहे.१ ऑगस्ट पासून १० विद्यार्थ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. सध्या हे विद्यार्थी समाजकल्याण विभागात काम करत आहे. काही दिवस कामाचा अनुभव आल्यानंतर त्यापैकी काही जणांची जिल्हापरिषदेच्या इतर विभागात नियुक्ती करण्यात येणार आहे. हे विद्यार्थी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून ऑनलाइन पध्दतीने बीबीए पदवीचा अभ्यास करत आहेत. कमवा आणि शिका हि योजना रत्नागिरी जिल्हा परिषदेने अंमलात आणली आहे. पुण्यानंतर हि योजना राबवणारा रत्नागिरी हा दुसरा जिल्हा आहे.शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना शासकीय कामकाज शिकण्याची संधी मिळत आहे.तसेच शासकीय काम करताना विद्यावेतनातून अर्थाजन होत आहे.बीबीएचा अभ्यास करताना प्रशासकीय कामकाजाचे धडे विद्यार्थी गिरवत आहेत.

# ७५ मच्छीमार नौकांची समुद्रात तिरंगा रॅली

**गुहागर:-** हलका वारा, अधूनमधून पडणार्या जोरदार सरी यांची परवा न करता गुहागर तालुक्यातील पडवे, नवानगरसह आजूबाजूच्या परिसरातील ७५ मच्छीमारांनी नौकांमधून हर घर तिरंगा मोहीम यशस्वीतेसाठी समुद्रामध्ये पडवे ते जयगड अशी रॅली काढली. प्रत्येक नौकेवर तिरंगा फडकवण्यात आला होता. देशभक्तीपर गितेही प्रत्येक नौकेवर लावण्यात आली होती. त्यामुळे मच्छीमारही भारावून गेले होते.

आझादी का अमृत महोत्सव संपूर्ण देशामध्ये साजरा केला जात आहे. याला अनुसरुन रत्नागिरीतील मच्छीमारांची समुद्रामध्ये नौकांद्वारे रॅली काढण्याचा निर्णय मत्स्य विभागाकडून घेण्यात आला होता. त्याला गुहागर तालुक्यातील मच्छीमारांनी प्रतिसाद



दिला. ७५ नौका सायंकाळी पडवे येथून एका रांगेत जयगडच्या दिशेने रवाना झाल्या. एका पाठोपाठ एक अशा नौकांचा ताफा समुद्रामधून पुढे सरकत होता. देशभक्ती जागृत करणारी गाणी प्रत्येक नौकेवर लावण्यात आली होती. पाऊस आणि वाऱ्यामुळे बिघडलेल्या परिस्थितीमध्येही मच्छीमारांनी पडवे ते जयगड आणि तेथून पुन्हा पडवे बंदरात अशी फेरी मारली. यावेळी एन. व्ही. भादुले मार्गदर्शनाखाली प्रत्येक नौकेवर तिरंगा लावण्यात आला होता. उद्घाटनप्रसंगी भादुले, गुहागर पो.नि.पाचपुते, परवाना अधिकरी देसाई, उत्कर्षा किर, पडवे सरपंच व आदर्श मच्छीमार संस्थेचे चेअरमन मुजीब जांभारकर, मुदसर खळे, मकबूल जांभारकर, मुस्तर खळे, नजीर जांभारकर, सागर सुरक्षा रक्षक स्वप्नील झिंगे, साईनाथ साळवी उपस्थित होते.

# रस्त्यावरील खड्ड्यातील पाण्याने शर्ट धुवून लोकप्रतिनिधींचा केला निषेध

**चिपळूण:-**रस्त्यावरील खड्ड्यांना जनता कंटाळली असून लोकप्रतिनिधी नावाने लाखोल्या वाहिल्या जात आहेत. चिपळूणतील नागरिक या खड्ड्यांना कंटाळले असून एका नागरिकाने अनोख्या पद्धतीने आंदोलन पुकारल आहे.

चिपळुणातील एक नागरिक रस्त्याने बहिणीकडे रक्षाबंधनसाठी जात असताना त्यांच्या शर्टवर रस्त्यातील खड्ड्यांचा चिखल उडाल्याने संतप्त झाले आहे. त्यांनी अंगावरील शर्ट काढून चक्क रस्त्यावरील चिखलाच्या पाण्याने धुवून काढला आणि लोकप्रतिनिधींच्या नावाने लाखोल्या वाहिल्या. त्यांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



# शहर डेंग्यू-मलेरियाच्या तापाने फणफणतोय

## आढळले डेंग्यूचे १४ तर मलेरियाचे ४७ रुग्ण

**ठाणे:** ठाणे महापालिका हद्दीत डेंग्यू आणि मलेरिया या तापाचे रुग्ण कमी होण्याऐवजी वाढताना दिसत आहेत. जून महिन्यात मलेरिया या आजाराचे एकूण २८ रुग्ण आढळून आले आहेत. तर डेंग्यूच्या संशयितांची संख्या ४० च्या घरात पोहोचली होती. पण निश्चित निदानात एकही डेंग्युचा रुग्ण आढळून आला नव्हता. परंतु, जुलै महिन्यात डेंग्यूचे १४ तर मलेरियाचे ४७ रुग्ण आढळून आल्याने शहर डेंग्यू-मलेरियाच्या तापने फणफणतोय असेच म्हणावे लागणार आहे.

ठामपा कार्यक्षेत्रामध्ये जुलै २०२२ मध्ये डेंग्यूचे संशयित रुग्ण संख्या ६४ होती. १४ जणांना डेंग्यूचे निश्चित निदान झाले. तर मलेरियाचे ४७ रुग्ण आढळून आले पण, चिकनगुनियाची रुग्णसंख्या शून्य आहे, यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी गृहभेटी देऊन एकूण ३४ हजार ५५१ घरांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत ४०४ घरे दूषित आढळून आली. तसेच एकूण ४७,३८३ कंटेनरची तपासणी केली असता ४९३ कंटेनर दूषित आढळून आली. या अनुषंगाने दरम्यानच्या कालावधीत कार्यक्षेत्रात ५० हॅण्डपंप, ट्रॅक्टर्स-१०, ई रिक्षा ६, १० बोलेरो वाहनांमार्फत दोन सत्रात ३ हजार १९४ ठिकाणी औषध फवारणी आणि धुरफवारणी हॅण्डमशीनद्वारे ११ हजार २०१ ठिकाणी धूरफवारणी करण्यात आली, तसेच ०४ ठिकाणी गप्पी मासे सोडण्याचे कार्यक्रम राबविण्यात आले असल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. भिमराव जाधव यांनी नमूद केले.

# पडलेल्या सरंक्षण भिंतीने मुलुंड ठाण्याची पायवाट रोखली



**ठाणे:** वागळे इस्टेट,श्रीनगर येथील मे.टाटा फैजेन कंपनीची सुमारे २५ फूट लांब व ०५ फूट उंच संरक्षण भिंत जवळच असलेल्या रोडवरती व नाल्यामध्ये पडली. याचदरम्यान जवळ असलेल्या विश्राम टॉवर क्रमांक-४ ची संरक्षण भिंतीला तडा जाऊन ती धोकादायक स्थितीत आली आहे. या घटनांमुळे मुलुंड मधून ठाण्यामध्ये येणारा पायवाटीचा रहदारीचा रस्ता तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात आला होता. ही घटना शुक्रवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास समोर आली. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

माजी नगरसेवक गुरुमुख सिंग यांनी दूरध्वनी करत आपत्ती व्यवस्थापन कक्षेत, वागळे इस्टेट, श्रीनगर, सेक्टर क्रमांक-३, विश्राम टॉवरच्या जवळ, मे. टाटा फैजेन कंपनीची संरक्षण भिंत जवळच असलेल्या रोडवरती व नाल्यामध्ये पडली. तसेच जवळ असलेल्या विश्राम टॉवर क्रमांक-४ ची संरक्षण भिंतीला तडा जाऊन ती धोकादायक स्थितीत आल्याची तक्रार केली. या घटनेची माहिती मिळताच, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी व कर्मचारी व वागळे प्रभाग समितीचे उप अभियंता (सार्व. बांधकाम विभाग) व कनिष्ठ अभियंता (सार्व. बांधकाम विभाग) यांनी धाव घेतली. सुरुवातीला या घटनेत कोणाला दुखापत झाली आहे का? याची विचारणा केली. त्यावेळी कोणालाही दुखापत झाली नसल्याची स्पष्ट झाले. तसेच खबरदारी म्हणून मुलुंड मधून ठाण्यामध्ये येणारा पायवाटीचा रहदारीचा रस्ता तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात आला. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.





# झाड आणि झाडाची फांदी पडून चार वाहनांचे नुकसान; घराचे पत्रेही फुटले

## चारचाकी वाहनासह तीन रिक्षांचा समावेश

ठाणे: शहरात झाड आणि झाडाची फांदी कोसळून घडलेल्या वेगवेगळ्या चार घटनांमध्ये एका चारचाकी कारसह तीन रिक्षा आणि दोन घराचे पत्रे फुटून नुकसान झाले आहे. या घटना शीळ डायघर गाव, वागळे इस्टेट आणि कोलशेत रोड या परिसरात घडल्या असून पडलेली झाड आणि फांदी कापून बाजूला करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली. याचदरम्यान शहरात मागील चोवीस तासात ५३.२९ मिमी पाऊस झाला आहे. तसेच गुरुवारी सकाळी साडेआठ वाजल्यापासून अडीच वाजेपर्यंत १७.७७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यामध्ये सकाळी साडेअकरा ते साडेबारा या तासाभरात १४.२२ मिमी पडल्याची नोंद झाली आहे.

बुधवारी रात्री ८ वाजून ११ मिनिटांच्या सुमारास शीळ,डायघर गाव येथील ठामपा शाळेजवळ एका ऑटो व रस्त्यावरती झाड कोसळले. यामध्ये कोणालाही दुखापत झाली नसून ऑटो रिक्षावरती झाड पडल्यामुळे रिक्षाचे नुकसान झाले आहे. तर ते झाड कापून बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला. तर गुरुवारी





पहाटे ५ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास वागळे इस्टेट,रूपादेवी पाडा नंबर-१, संजय गांधी मैदान जवळ झाडाची मोठी फांदी घरावरती व समोर असलेल्या दोन ऑटो रिक्षावर पडल्याने कोणालाही दुखापत झालेली नाही. मात्र घरावर झाडाची मोठी फांदी पडल्यामुळे घराचे पत्रे फुटून नुकसान झाले तर दोन ऑटो रिक्षांचेही नुकसान झाले आहे. तसेच कोलशेत रोड, हनुमान मंदिर जवळ पार्क केलेल्या चारचाकी वाहनावर झाड पडल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. यामध्ये त्या कारचे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर वागळे इस्टेट रोड नंबर २२ येथील मारवाडी चाळी मधील एका घरावर झाड पडले. यामध्ये त्या घराचे किरकोळ नुकसान झालेले असून ही घटना दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली. त्याचबरोबर देवदया नगर,खारटन रोड, पोखरण रोड नंबर २, ओवळा नाका, दमानी इस्टेट, नौपाडा हरिनिवास सर्कल आणि कोपरी गाव येथे झाडे कोसळली असून त्या घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दल या विभागांनी धाव घेत, तेथील पडलेली झाडे आणि फांदया या दोन्ही विभागांनी कापून रस्त्याच्या एका बाजूला केली आहेत. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

# ठामपाच्या हजेरी शेडवर साजरी झाली राखीपौर्णिमा




**ठाणे :** रक्षाबंधन हा बहिण भावाच्या अतूट नात्याचा सण.. हा सण गुरुवारी ठाणे महापालिकेच्या विविध हजेरी पेटीवर साजरा करण्यात आला. महापालिकेच्या हजेरी पेटीवर काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी पुरूष कर्मचारी, महापालिका अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले असून यासाठी त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.ठाणे महापालिकेच्या एकूण ५० हजेरी शेड असून या ठिकाणी महापालिकेचे १९०० कर्मचारी असून त्यापैकी ११४० पुरुष व ७६० महिलांचा समावेश आहे. तर एकूण २०३६ कंत्राटी कामगार असून त्यापैकी १२२२ पुरुष व ८१४ महिला काम करीत आहे. आज महापालिकेच्या सर्व हजेरी शेडवर महिला कर्मचाऱ्यांनी रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला.




स्वातंत्र्याच्या
अमृत महोत्सवानिमित्त
निमित्त
हार्दिक शुभेच्छा
श्री. संजय भगत
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
15
August
शुभेच्छुक :
संजय भगत मित्र मंडळ